02-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01-02-2025 22:16 Page 1



निवडक



शिवोली : आरोग्य शिबिरात तपासणी करतांना डॉ. पृथ्वी आमोणकर सोबत कपील कोरगांवकर व इतर.

## शिवोलीतील आरोग्य शिबिरात दीडशे जणांची तपासणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १ :** आपल्या राज्यासह शेजारच्या राज्यात आरोग्याच्या चांगल्या सोयीसुविधा आहेत तसेच सरकारच्या वतीने आयुष्यमान भारत सारख्या अनेक आरोग्यदायी योजना आज देशात कार्यरत आहेत त्या योजनांचा देशवासियांनी लाभ घ्यावा व आपले आरोग्य सांभाळावे असे आवाहन डॉ. रघुवीर च्यारी यांनी शिवोलीत केले. सामाजिक कार्यकर्ते कपील कोरगावकर व सहकारी मित्रांतर्फे दांडा- शिवोली येथील श्रीजागरेश्वर मंदिराच्या सभागृहात एकदिवसीय आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

शिबिरात डॉ. पृथ्वी आमोणकर, डॉ. पी.व्ही.नाईक, डॉ.विष्णु गडेकर, डॉ.यतीन वेर्लेकर, डॉ. राहुल सुर्यवंशी, डॉ. धर्मांद मोरजकर, डॉ. विराजा वेर्लेकर, डॉ. नविता गडेकर, डॉ. एडोन्सिया फर्नांडिस आदी नामवंत डॉक्टर्सनी या शिबिरात भाग घेतला. दरम्यान, शिवोली पंचायत क्षेत्रातील दांडा तसेच गुडे प्रभाग मर्यादित आयोजित या शिबिराचा सुमारे शंभर ते दिडशे लोकांनी लाभ घेतला यापुढेही अशाच प्रकारच्या आरोग्य शिबिरांचे संपूर्ण शिवोली मतदारसंघात आयोजन केले जाणार असल्याचे कपील कोरगांवकर यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी आयफायच्या प्रसन्ना भांगी, आरीत व्हेजिटेबल्चे महेश कोटकर, सामाजिक कार्यकर्त्या पार्वती नागवेंकर, शापोरा बोट असोसिएशनचे बलभीम मालवणकर, यश कोचरेकर, नंदीनी कपील कोरगांवकर व इतरांनी कष्ट घेतले.

## बोरी पंचायतीतर्फे ज्येष्ठ, श्रेष्ठ नागरीकांचा सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

**बोरी, दि. १ :** येथे बोरी पंचायतीतर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोरी गावातील कर्तुत्वान नागरिकांचा व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार पंचायत उपसंचालक प्रसिद्ध नाईक व उपजिल्हाधिकारी स्नेहल प्रभू, यांच्या हस्ते करण्यात आला.

बोरी पंचायत तर्फे प्रजासत्ताक दिनी गावातील सर्व वाड्यावरील प्राथमिक शिशु विद्यालये व अंगणवाडी यांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त मान्यवरांचा सत्कार समारंभाचेही आयोजन करण्यात आले होते. बोरी येथील श्री साईबाबा मंदिराच्या सभागृहात झाले.

यावेळी उपजिल्हाधिकारी स्नेहल प्रभू, सरपंच जयेश नाईक, उपसरपंच रश्मी नाईक, किरण नाईक, भावना नाईक, सागर नाईक, सुनील नाईक, विनय बोरकर, साईबाबा मंडळाचे अध्यक्ष दिनेश रायकर सचिव उमेश नाईक व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्नेहल प्रभू यांनी आपले विचार मांडले.गावातील जाणता कर्तुत्वान व्यक्तींचा गौरव केल्याने त्यांच्याकडून नवीन पिढीला व युवकांना आदर्श प्रोत्साहन मिळते. बोरी पंचायत अशा छान उपक्रम घडवून आणून स्नेहसंमेलनात द्वारे मुलांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देत आहे, असे प्रतिपादन पंचायत उपसंचालक प्रसिद्ध नाईक यांनी केले. याप्रसंगी पंचायतीतर्फे गावातील प्रत्येक प्रभागातील ज्येष्ठ कलाकाराचा व समाजसेवकांचा यावेळी शाल, श्रीफळ व भेटवस्तु आनंद सावळो नाईक, मेघना देवारी, शास्त्रीय गायक प्रदीप नाईक, रघुनाथ नाईक, सुर्यकांत नाईक, रमाकांत बोरकर, माजी सरपंच विठु गावडे, नेमू मुळी, अनिता बोरकर, विद्याधर पारपती, क्रीडा शिक्षक आशय कोरडे, स्वप्निल नाईक, डॉ. केतन नाईक यांना प्रदान करून सत्कार करण्यात या कार्यक्रमात श्री साई मंदिराचे अध्यक्ष दिनेश रायकर यांच्या हस्ते पंचायत उपसंचालक प्रसिद्ध नाईक, उपजिल्हाधिकारी स्नेहल प्रभू यांना गौरविण्यात आले. सरपंच जयेश नाईक यांनी स्वागत केले. तर मनुराय नाईक यांनी सूत्रसंचालन केले. नंतर विविध शाळातील मुलांची सांस्कृतीक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मांद्रे हायस्कूलमध्ये हळदी कुंकू समारंभ साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** मांद्रे हायस्कूल व पालक शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक हळदीकुंकू समारंभ मांद्रे हायस्कूल सभागृहात पार पडला.

यंदा संस्थेस साठ वर्षाच्या हिरक महोत्सवी वर्षा निमित्त यावेळी या कार्यक्रमास मांद्रे हायस्कूलमध्ये शिकून डॉक्टर झालेल्या डॉ.मृदुल मळगावकर,डॉ. रुही नाईक,डॉ. ऋचा गोसावी,डॉ. स्वरदा आजगावकर,आणि डॉ.तन्वी केरीकर अतिथी म्हणून उपस्थित राहिल्या. पाचही तज्ञ डॉक्टरांनी आपापल्या विषयाशी संबंधित आरोग्य विषयक महत्त्वाची माहिती महिलांना दिली. तसेच अनेक वर्षांनी आपल्या शाळेने आपली आठवण करून शाळेत बोलवलं तसेच शाळेच्या जुन्या आठवणी ताज्या केल्या त्या करिता शाळेचे ऋण व्यक्त केले.या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा प्रभू, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा सौ. नेत्रा मांद्रेकर,उपसरपंच्या तारा हडफडकर,पालक शिक्षक संघाच्या महिला सदस्या रश्मी नाईक देसाई व सौ.भक्ती मांद्रेकर उपस्थित होत्या.

हळदी-कुंकूच्या निमित्ताने महिला पालकांसाठी हातावर मेहंदी काढण्याची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत माधुरी मांजरेकर, बनी नाईक व देविता किनळेकर यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक मिळाले. तर संजना पार्सेकर व स्वस्तिका म्हामल यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया गोसावी व आभार प्रदर्शन तेजा सावंत यांनी केले.

# पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा दणदणीत विजय!

### कसोटीमध्ये नोंदवला तिसरा मोठा विजय | एक डाव आणि २४२ धावांनी जिंकली

**गॅले, दि. १ :**

ऑस्ट्रेलियाने श्रीलंका दौऱ्याची सुरुवात विजयाने केली आहे. शनिवारी गॅले येथील पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने यजमान श्रीलंकेचा एक डाव आणि २४२ धावांनी दारुण पराभव केला. ऑस्ट्रेलियाने गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्ही विभागात दमदार प्रदर्शन केले आहे. विशेष म्हणजे ऑस्ट्रेलियाचा हा परदेशी भूमीवर तिसरा सर्वात मोठा विजय ठरला आहे.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाने आपला पहिला डाव ६ बाद ६५४ धावांवर घोषित केला होता. प्रत्युत्तरात श्रीलंकेला पहिल्या डावात १६५ आणि दुसऱ्या डावात २४७ धावाच करता आल्या.




ऑस्ट्रेलियाने कसोटी क्रिकेटमध्ये परदेशी भूमीवर तिसरा सर्वात मोठा विजय नोंदवण्याचा विक्रम केला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा ऑस्ट्रेलियाचा चौथा सर्वात मोठा विजय आहे. २३ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियन संघाने २०० हून अधिक धावा आणि डावांच्या फरकाने कसोटी सामना जिंकला आहे. यापूर्वी २००२ मध्ये ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा घरच्या मैदानावर ३६० धावा आणि एका डावाच्या फरकाने पराभव केला होता.

**ऑस्ट्रेलियाचे आतापर्यंतचे कसोटीतील सर्वात मोठे विजय**

१. डावाने आणि ३६० धावांनी दक्षिण आफ्रिका विरुद्ध, जोहान्सबर्ग, २००२

**२.** डावाने आणि ३३२ धावांनी इंग्लंड विरुद्ध, ब्रिस्बेन, १९४६

**३.** डावाने आणि २५९ धावांनी दक्षिण आफ्रिका विरुद्ध, गकेबेरहा, १९५०

**४.** डावाने आणि २४२ धावांनी श्रीलंका विरुद्ध, गॅले, २०२५

**५.** डावाने आणि २२६ धावांनी भारत विरुद्ध, ब्रिस्बेन, १९४७

ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी पहिल्या दिवसापासून श्रीलंकेच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. ऑस्ट्रेलियाचा सलामीचा फलंदाज उस्मान ख्वाजाने शानदार द्विशतक झळकावले. ख्वाजाने २३२ धावांची उत्कृष्ट खेळी साकारली, ज्यात त्याने १६ चौकार आणि १ षटकार मारला. याशिवाय कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि पदार्पणवीर जोश इंग्लिसने शतकं झळकावण्याचा पराक्रम केला

स्मिथने १४१ आणि इंग्लिसने १०१ धावांचे योगदान दिले.

वादावर बॉलिंग कोच मॉर्ने मॉर्केलचे मोठे वक्तव्य

अशा प्रकारे ऑस्ट्रेलियाने आपला पहिला डाव ६५४/६ धावांवर घोषित केला. या प्रचंड धावसंख्येच्या प्रत्युत्तरात श्रीलंकेचा पहिला डाव अवघ्या १६५ धावांत आटोपला. त्यानंतर यजमान संघाला फॉलोऑन खेळावा लागला. दुसऱ्या डावातही श्रीलंकेला केवळ २४७ धावा करता आल्या आणि ऑस्ट्रेलियाने पहिली कसोटी एक डाव आणि २४२ धावांनी जिंकली.

## केशव स्मृती उच्च माध्यमिक लेदर बॉल क्रिकेट टुर्नामेंटचे जेते



दाबोळी : लेदर बॉल क्रिकेट टुर्नामेंटमधील जेतेपद पटकावलेले केशव स्मृती विद्यालयाचे विद्यार्थी.

■ टीम दैनिक हेराल्ड

**दाबोळी, दि. १ :** क्रीडा संचालनालयाने आयोजित केलेल्या लेदर बॉल क्रिकेट विभाग ३ टुर्नामेंटमध्ये केशव स्मृती उच्च माध्यमिक विद्यालयाने जेतेपद पटकावले. फातोर्डा येथे झालेल्या अंतिम सामन्यांत केशव स्मृतीने आरएसएस उच्च माध्यमिक विद्यालयाचा २४ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करून केशव स्मृतीने २० षटकांत १०४ धावा केल्या. यात कातिर्क सिंगने २८ धावा केल्या तर अभिनवने २३ धावा केल्या.

या धावांचा पाठलाग करताना आरएमसने केवळ ८० च धाव्या केल्या. त्यामुळे केशव स्मृतीचा २४ धावांनी विजय झाला. केशव स्मृतीतर्फे युवराज रावने ९ धावा देऊन ४ गडी बाद केले. अनुजने ८ धावा देऊन २ गडी बाद केले. कार्तिक सिंगने १५ धावा देऊन २ गडी बाद केले. मदन मज्ञगी याने २५ धावा देऊन २ गडी बाद केले.

## हरमलचे इथे ओशाळला मृत्यू ४ रोजी कारवारला

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** पिंपळकट्टा सदाशिवगड येथील नवरात्री उत्सव समिती आयोजित श्री गणेश जयंती निमित्त, दुर्वांकुर कला केंद्र निर्मित 'इथे ओशाळला मृत्यू' नाटक मंगळवार ४ फेब्रुवारी संध्याकाळी ७ वाजता, पिंपळकट्टा सदाशिवगड कारवार येथे होणार असल्याचे नाटकाचे दिग्दर्शक अनिल आसोलकर व संस्थेचे ज्येष्ठ सदस्य अशोक हरमलकर यांनी सांगितले.

कारवार येथे माघ श्री गणेश जयंती उत्सव १ ते ५ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे. त्यानिम्मित शनिवार १ रोजी श्री मूर्ती स्थापना, सोमवार ३ रोजी घुमट सुवारी वादन कार्यक्रमांत शहनाई वादक गोपाळ वाजंत्री व ग्रुप,अंकोला,संध्याकाळी ७ वाजता पूजा, रात्री ९ वाजता संगीत नाद तरंग, शास्त्रीय कार्यक्रम सदाशिवगड, बुधवार ४ रोजी सकाळी ९.३० वाजता गण होम,पूजा,दुपारी १२.३० वाजता महाप्रसाद, अन्न संतर्पण व संध्याकाळी ७ वाजता ऐतिहासिक इथे ओशाळला मृत्यू नाटक सादर होणार आहे. या नाटकात शशिकांत कोरकणकर,दत्ताराम ठाकूर, प्रकाश रामजी, भरत वस्त, अर्जुन गडेकर, विजय बर्डे, संजय नाईक, रामचंद्र केरकर, भावेश गडेकर, प्रकाश कोरकणकर, महादेव गावडे, सोनिया शेट्ये, संजय नाईक, सागर कोरकणकर, विजय कोरकणकर, रुपेश कोरकणकर, श्रीकांत कानोजी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानचा संघ जाहीर

**इस्लामाबाद, दि. १ :**

पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी संघ जाहीर केला आहे. बाबर आझमसोबत मोहम्मद रिझवानचाही संघात समावेश करण्यात आला आहे. रिझवानवर मोठी जबाबदारी आली आहे. तो स्पर्धेत संघाचे नेतृत्व करेल. अनुभवी खेळाडू फखर झमान देखील संघाचा भाग आहे. सलमान अली आगा आणि उस्मान खान यांनाही संधी देण्यात आली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ १९ फेब्रुवारीपासून सुरू होईल. भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील सामना रविवार दि. २३ रोजी खेळला जाईल.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने शुक्रवारी संध्याकाळी संघाची घोषणा केली. पाकिस्तानने २०१७ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. आता संघ पुन्हा एकदा जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल. पाकिस्तान या स्पर्धेचे आयोजन करत आहे. तर भारतीय संघ त्यांचे सर्व सामने दुबई, यूएई येथे खेळेल.

पाकिस्तान संघ बराच संतुलित दिसत आहे. अनुभवी खेळाडू बाबर आझम आणि फखर झमान हे संघाचा भाग आहेत. फखर जमानने पाकिस्तानकडून ८२ एकदिवसीय सामने खेळले आहेत. या दरम्यान त्याने ३४९२ धावा केल्या आहेत. त्याने एक द्विशतकही झळकावले आहे. कामरान गुलाम आणि सौद शकील यांनाही संघात स्थान मिळाले आहे. फहीम अश्रफ हा देखील पाकिस्तान संघाचा भाग आहे.

पाकिस्तानची गोलंदाजी यूनिट खूपच घातक आहे. शाहीन आफ्रिदी आणि नसीम शाह हे संघाचा भाग आहेत. शाहीनबद्दल बोलायचे झाले तर, त्याने ५९ एकदिवसीय सामन्यांमध्ये ११९ विकेट्स घेतल्या आहेत. त्याच्यासोबत हरिस रौफ आणि मोहम्मद हसनैन यांनाही स्थान मिळाले आहे. फिरकी गोलंदाज अबरार अहमद देखील या स्पर्धेत खेळताना दिसणार आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी पाकिस्तान संघ: मोहम्मद रिझवान (कर्णधार), बाबर आझम, फखर जमान, कामरान गुलाम, सौद शकील, तय्यब ताहिर, फहीम अश्रफ, खुशदिल शाह, सलमान अली आघा, उस्मान खान, अबरार अहमद, हरिस रौफ, मोहम्मद हसनैन, नसीम शाह, शाहीन शाह आफ्रिदी.

**पाकिस्तानचे गट टप्प्यातील सामने - १९ फेब्रुवारी - पाकिस्तान विरुद्ध न्यूझीलंड, कराची २३ फेब्रुवारी - पाकिस्तान विरुद्ध भारत, दुबई**

**२७ फेब्रुवारी - पाकिस्तान विरुद्ध बांग्लादेश, रावळपिंडी**


अन्न आणि औषधे प्रशासन संचालनालय
गोवा सरकार

Eat Right India
योग्य भोजन, चांगले जीवन.

ई-कॉमर्स अन्न व्यवसाय चालकांनो
कठोर पालनासाठी नोंद घ्या



- ई-कॉमर्स अन्न व्यवसाय चालकांनी ऑनलाईन विकल्या जाणाऱ्या अन्न उत्पादनांची सुरक्षा, दर्जा आणि सत्यता वा अस्सलतेची खात्री करण्यासाठी अन्नातून होणारे आजार व फसवी कृत्ये यांसह त्यांसोबतचे धोके टाळण्यासाठी कठोर पालन करणे अत्यंत महत्वाचे आहे.
- अगदी शेवटच्या डिलीव्हरी व्यक्तीच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देणे ई-कॉमर्स एफबीओंची एक अतिशय गरज आहे. हे आवश्यक आहे की, अन्न सुरक्षा व स्वच्छता पद्धतींमध्ये डिलीव्हरी देणारे कर्मचारी प्रशिक्षित असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.
- तसेच पुढे, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील केले जाणारे कोणत्याही उत्पादनासंबंधीचे दावे त्या उत्पादनाच्या भौतिक लेबलवर दिलेल्या माहितीशी पूर्णपणे जुळणारे असावेत. उत्पादनाच्या पॅकेजिंगवर सिद्ध केलेले दावे ऑनलाईन असावेत.
- ई-कॉमर्स एफबीओंनी खात्री करावी की, ग्राहकाला दिल्या जाणाऱ्या उत्पादन हे उर्वरित काळात पुरेसे टिकणारे असावे. एफएसएसएआय आदेश देते की, डिलीव्हरी देतेवेळी या उत्पादनांचा टिकणारा काळ हा कमाल वापर कालावधीपूर्वी (एक्सपायरी) किमान ३०% किंवा किमान ४५ दिवस असावा.
- ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स यांनी विक्रेत्याचे एफएसएसएआय परवाना/नोंदणी क्रमांक व अन्न व्यवसाय चालकाने मिळवलेले स्वच्छता मानांकन (रेटिंग) स्पष्टपणे प्रदर्शित केलेला असणे आवश्यक आहे.
- हे पुन्हा विशद केले जाते की, कोणत्याही ई-कॉमर्स एफबीओने त्यांच्या प्लॅटफॉर्मवर कोणत्याही अन्न व्यवसाय चालकाचे (विक्रेता) त्यांचे वैध एफएसएसएआय परवाना वा नोंदणी प्रदर्शित केल्याशिवाय त्यांच्या यादीत त्यास घेऊ नये.

fssai FOOD SAFETY AND STANDARDS AUTHORITY OF INDIA
Inspiring Trust, Assuring Safe & Nutritious Food
Ministry of Health and Family Welfare, Government of India

आत्मनिर्भर भारत
स्वयंपूर्ण गोवा

FIT INDIA


# ज्ञानप्रकाश उच्च माध्यमिक विद्यालयाला राज्यस्तरीय कबड्डी चॅम्पियनशीप

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १ :** मुळगाव येथील ज्ञानप्रकाश उच्च माध्यमिक विद्यालयाने राज्य स्तरीय चॅम्पियन शीप प्राप्त करून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले. क्रीडा आणि युवा प्राधिकरण संचनालयातर्फे आंतर उच्च माध्यमिक विद्यालय कबड्डी स्पर्धा २०२४-२५ क्रीडा संकुल - पेडे म्हापसा खेळविण्यात आलेल्या स्पर्धेत हे राज्यस्तरीय जेतेपद पटकावले.

या विजेत्या संघात प्राजवी टोपले ( कर्णधार ), दिपीका मावळिंगकर, चंद्रमुखी नाईक, सलोनी घाडी, प्राची खेडेकर, वेदिका घाडी, दिक्षिता पिरणकर, श्रेया परब, निलीमा नाईक, करीनादेवी कश्यप, शांती कोटपेट व आस्था परब या महिला खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. यावेळी राज्य क्रीडा अधिकारी अनंत सावळ, ज्ञानप्रकाश उच्च माध्यमिक विद्यालय - मुळगाव च्या चेअरमन प्रिया राऊत, चंद्रेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य, ज्ञानप्रकाश चे क्रीडा प्रशिक्षक प्रा. मंगेश परब, शिक्षक धीरज मातोंणकर, प्रणिता शिरगांवकर, सुशभ मोरजकर आदी मान्यवर उपस्थित होते.



मुळगाव : राज्य स्तरीय चॅम्पियन मुलींच्या संघासोबत राज्य क्रीडा अधिकारी अनंत सावळ, चेअरमन प्रिया राऊत, मंगेश परब व मान्यवर.

RNI No. GOAMAR/2013/49899 दैनिक हेराल्ड वर्ष १३, अंक १५१ मालक: हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्रिंटर: श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, प्रकाशक: श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, प्रकाशन स्थळ: हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, छपाई स्थळ: हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. एडिटर इन चीफ: श्री. आर. एफ. फर्नांडिस, संपादक: श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 Dainik Herald Volume 13, Issue 151 Owner: Herald Publications Pvt. Ltd., Printer: Mr. Walter Ligorio D'Sousa, Publisher: Mr. Walter Ligorio D'Sousa,, Published from: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and Printed from: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. Editor in Chief Mr. R. F. Fernandes, Editor : Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .